भंडारा जिल्हा पोलीस वार्तापत्र

(सकाळ)

जा.क्र.२६७/माहिती कक्ष/वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा
दिनांक १४/०४/२०१७

**१) संगनमत करुन क्षुल्लक कारणावरुन लोखंडी रॉडने मारुन गंभिर दुखापत करुन जिवानीशी ठार मारण्याचा प्रयत्न केल्याने गुन्हा नोंद . :—**

दिनांक १२/०४/२०१७ चे २०.३० वा. दरम्यान यातील फिर्यादी व फिर्यादीचा पती जखमी विजय कोठीराम लेंडे वय २८ वर्ष, हे गावातील ईलेक्ट्रीक दुकाण बंद करुन घरी आले असता यातील तिन्ही आरोपीतांनी संगनमत करुन फिर्यादीचे पती सोबत घराचे ईलेक्ट्रीक बिल व मकानाचे हिस्से वाटणी वरुन भांडण करुन जखमीचे डोक्यावर, पायावर लोखंडी रॉडने मारुन गंभीर दुखापत करुन जिवानीशी ठार मारण्याचा प्रयत्न केल्याने फिर्यादी सौ. ईद्रायणी विजय लेंडे वय २० वर्ष, रा. खमारी यांचे बयाण व डॉक्टरी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन कारधा येथे कलम ३०७,३४ भांदवि. अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला. पुढील तपास सपोनी. इंगोले पोलीस स्टेशन कारधा हे करीत आहे.

**२) अज्ञात वाहन चालकांच्या निष्काळजीपणामुळे पायी फिरणाऱ्या इसमाच्या मरणास कारणीभुत झाल्याने गुन्हा नोंद . :—**

दिनांक १२/०४/२०१७ चे २१.३० वा. दरम्यान यातील मृतक नंदकिशोर रामराव वंजारी वय ६० वर्ष, रा. लाखनी हा फिर्यादी कडे पाहुणा म्हणुन आला होता व जेवन करुन रोडचे पायी फिरत असता त्यास कोणीतरी अज्ञात वाहन चालकाने आपले ताब्यातील वाहन भरधाव वेगाने, निष्काळजीपने चालवुन भंडारा ते पवनी कडे जाणाऱ्या रोडवर आंबाडी गावाजवळ धडक मारल्याने गंभिर जखमी होवुन त्याचे मरणास कारणीभुत झाल्याने फिर्यादी दिनदयाल नंदकिशांर वंजारी वय ३५ वर्ष, रा. मुरमाडी यांचे तोंडी रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन कारधा येथे कलम २७९,३०४(अ) भादंवि. सहकलम १८४/१७७ मोवाका अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोउपनी. गोपाले पो.स्टे. कारधा हे करीत आहेत.

**३) जेशीपी मशिनचा हायड्रोलीक पंपची चोरी . :—**

दिनांक १२/०४/२०१७ चे २१.०० वा. ते १३/०४/२०१७ चे ०७.०० वा. दरम्यान यातील फिर्यादी अमोल रामुजी केवट वय २६ वर्ष, रा. चिखल पहेला याने आपले ताब्यातील जेशीपी मशिनचा हायड्रोलीक पंप किंमती ३,०००/—रु. असा एकुण ७३,०००/—रु. चा माल औदयोगिक प्रशिक्षण केन्द्र गडेगाव येथील खुल्या जागेत ठेवले असता कोणीतरी अज्ञात चोराने कुणीही नसल्याची संधी साधुन चोरुन नेल्याने फिर्यादी यांचे तोंडी रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन लाखनी येथे कलम ३७९ भादंवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोना. इळपाते पो.स्टे. लाखनी हे करीत आहेत.

४) अवैध दारु/ जुगार अडयांवर धाडी . :-

दिनांक १३/०४/२०१७ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी पो स्टे लाखांदुर येथे अवैध दारू/जुगार अडयांवर धाडी घालुन एकुण ०५ गुन्हे दाखल करून आरोपींच्या ताब्यातुन १५ लिटर हातभट्टी दारु किंमती १५००/-रु. व ४५ लिटर ६३० मिली लीटर देशी दारु + १ मोटार सायकल किंमती २३,१७५/-रु. तसेच जुगारातुन किंमती ११४/-रु. चा माल असा एकुण २४,७८९/-रु. चा माल जप्त करण्यात आला आहे.

(एस. व्ही. कुलकर्णी )
पोलीस उपअधिक्षक (गृह)
भंडारा
दुरध्वनी.क्र. ९९८७३८५४०५

प्रति,

जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा

वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

प्रत, संगणक कक्ष, भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता